ePaper

## “उद्धव ठाकरे अफझल खानासारखे आले”; रामदास कदमांचा टोला



| वर्ष - 6 | अंक - 330 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- मेट्रोचे काम संपेना, प्रवासीही मिळेनात!
- बोटांचे ठसे जुळेनात, ‘आधार’ दुरुस्त होईना
- आता आर्थिक दुर्बल घटकांनाही मिळणार घरे?


www.mahaenews.com | रविवार, दि. 19 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुण्यात वीज खंडीत मोहिम जोमात!

## » वीजग्राहकांनी थकवले 146 कोटी; 'महावितरण'कडून वीजपुरवठा तोडण्याची मोहीम

**। पुणे । महाईन्यूज ।**




**पुणे विभागातील सहा लाख ३६ हजार ५४१ घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक ग्राहकांनी १४६ कोटी १४ लाख रुपयांचे वीजबिल थकवले आहे. त्यामुळे ‘महावितरण’कडून थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई हाती घेण्यात आली आहे. वीजग्राहकांनी त्वरित थकबाकीचा भरणा करावा आणि वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई टाळावी; चालू वीजबिल नियमित भरून सहकार्य करावे, असे आवाहन ‘महावितरण’कडून करण्यात आले आहे.**

शहरात दोन लाख ४२ हजार ९३७ घरगुती ग्राहकांकडे ३४ कोटी ८२ लाख रुपयांची थकबाकी आहे. ३७ हजार ८७९ वाणिज्यिक ग्राहकांकडे १३ कोटी ३४ लाख रुपये आणि तीन हजार २२४ औद्योगिक ग्राहकांकडे एक कोटी ८४ लाख रुपयांची थकबाकी आहे. घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वर्गवारीमध्ये शहरातील एकूण दोन लाख ८४ हजार ४० वीजग्राहकांकडे ५० कोटी ०३ लाख रुपयांची थकबाकी आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील एक लाख एक हजार ३५ घरगुती ग्राहकांकडे १८ कोटी ५० लाख रुपयांची थकबाकी आहे. याशिवाय १६ हजार ९३५ वाणिज्यिक ग्राहकांकडे आठ कोटी सात लाख रुपये आणि चार हजार ७९६ औद्योगिक ग्राहकांकडे आठ कोटी ५८ लाख रुपयांची थकबाकी आहे. घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वर्गवारीमध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील एकूण एक लाख ३१ हजार ७६६ ग्राहकांनी ३५ कोटी १७ लाख रुपयांची रक्कम थकवली आहे. ग्रामीण भागांतील आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, वेल्हे आणि हवेली या तालुक्यांतील एक लाख ९६ हजार ४२४ घरगुती ग्राहकांकडे ४० कोटी १६ लाख रुपये, २० हजार २३३ वाणिज्यिक ग्राहकांकडे १२ कोटी २५ लाख रुपये आणि चार हजार ७७ औद्योगिक ग्राहकांकडे आठ कोटी ५२ लाख रुपयांची थकबाकी आहे.

### ‘वीकेंड’ला भरणा केंद्रे सुरु

**» वीज ग्राहकांना चालू आणि थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे, म्हणून पुणे विभागातील ‘महावितरण’ची सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे आज, रविवारी (१९ मार्च) कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहे. यासोबतच लघुदाब वीजग्राहकांना थकबाकी आणि चालू बिलांचा घरबसल्या भरणा करण्यासाठी WWW.MAHADISCOM.IN या वेबसाइटची मदत घेता येणार आहे.**

| पुणे शहरातील थकबाकी | पिंपरीतील थकबाकी |
|---|---|
| घरगुती ग्राहक | घरगुती ग्राहक |
| ३४.८२ कोटी | १८.५० कोटी |
| वाणिज्यिक ग्राहक | वाणिज्यिक ग्राहक |
| १३.३४ कोटी | ८.०७ कोटी |
| औद्योगिक ग्राहक | औद्योगिक ग्राहक |
| १.८४ कोटी | ०८.५८ कोटी |

# पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणी पारदर्शीपणे करा!

## » आमदार अण्णा बनसोडे : डुडूळगाव येथील प्रकल्पाची चौकशी करून कारवाई करा

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहरात पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजाणवी सक्षम व पारदर्शीपणे करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि केंद्र सरकारच्या पुढाकाराने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध ठिकाणी सदनिका उभारण्यात येत आहेत. या सदनिकांचा लाभ गरजू लोकांपर्यंत मिळाला पाहिजे, अशी आमची आग्रही भूमिका आहे.

सध्यस्थितीला आकुर्डी, पिंपरी येथे या योजनेतून गृहप्रकल्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे सुमारे १ हजार सदनिका तयार आहेत. मात्र, त्यांचे वाटप करण्यात आलेले नाही. पिंपरी विधानसभा मतदार संघात सर्वाधिक लाभार्थी आहेत. या मतदार संघातील गोरगरिब नागरिकांना हक्काचे घर मिळावे, अशी अपेक्षा आहे. प्रशासकीय दप्तर दिरंगाईमुळे सदनिका वाटप रखडल्याचे निदर्शनास येत आहे.




विशेष म्हणजे, चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी आणि रावेत येथील गृहप्रकल्पांसाठी प्रशासनाने ५ हजार रुपयांचा डीडीसह नव्याने अर्ज मागवण्यात आले होते. त्याला शहरातून सुमारे ५० हजार नागरिकांना प्रतिसाद दिला. त्यापैकी ३ हजार ६६४ लाभार्थ्यांची यादी जानेवारी २०२१ मध्ये निश्चित करण्यात आली. मात्र, अद्याप सदनिकांचे वाटप करण्यात आलेले नाही. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काचे घर निश्चित वेळेत देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा आहे, असेही आमदार बनसोडे यांनी म्हटले आहे.

### दूध का दूध, पाणी का पाणी झाले पाहिजे

**»डुडूळगाव येथील प्रकल्पावरुन लोकप्रतिनिधींनी घोटाळा झाल्याचे आरोप केले आहेत. याबाबत स्थानिक प्रसारमाध्यमांमधून वृत्त प्रसिद्ध झाले आहे. संबंधित प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पारदर्शीपणे राबवली पाहिजे. तसेच, या प्रकल्पात काही अनियमितता झाली असेल, तर संबंधित निविदा तात्काळ रद्द केली पाहिजे. महापालिका प्रशासनाने याबाबत सखोल चौकशी करुन ‘दूध का दूध -पानी का पानी’ करावे. तसेच, चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथील सदनिकांचे वाटप करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. तसेच, रावेत येथील प्रकल्पाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे शहरातील पंतप्रधान आवास योजनेबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्यामुळे प्रशासनाने लाभार्थ्यांना दिलासा देण्याची भूमिका घ्यावी, अशी आमची मागणी आहे.**

# मेट्रोचे काम संपेना, प्रवासीही मिळेनात!

## वर्षभरानंतरही गती संथ; दिवसाला सरासरी 5 हजार प्रवासी

।पुणे। महाईन्यूज ।



**मोठा गाजावाजा करीत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रो सेवा सुरू झाली. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेट्रोला हिरवा झेंडा दाखवला. परंतु, मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे काम अजूनही संपत नसल्याचे चित्र आहे. या कामामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकटच होत आहे. यातच प्रवाशांनीही मेट्रोकडे पाठ फिरवली आहे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो प्रवासी सेवेला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात पिंपरी-चिंचवड महापालिका स्थानक ते स्वारगेट स्थानक (१७ किलोमीटर) आणि वनाझ स्थानक ते रामवाडी स्थानक (१६ किलोमीटर) असे ३३ किमी लांबीचे दोन मार्ग आहेत. त्यापैकी पिंपरी-चिंचवड महापालिका स्थानक ते फुगेवाडी स्थानक या ७ किलोमीटर मार्गावर आणि वनाज स्थानक ते गरवारे महाविद्यालय स्थानक या ५ किलोमीटर मार्गावर प्रवासी सेवा गेल्या वर्षी ६ मार्चला सुरू करण्यात आली. मात्र, वर्षभरानंतरही विस्तारित प्रवासी सेवा मेट्रोला पूर्ण करता आलेली नाही. मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील कामे दोन्ही शहरांत सुरू आहेत. अनेक रस्त्यांवर ही कामे सुरू आहेत. हे सर्व मुख्य रस्ते असून, अतिशय वर्दळीचे रस्ते आहेत. मेट्रोच्या कामांमुळे हे रस्ते अरूंद झाले आहेत. कारण या रस्त्यांचा बहुतांश भाग मेट्रोच्या कामाने व्यापला आहे. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या भीषण स्वरूप धारण करीत आहे. आधीच कोंडीने त्रासलेल्या वाहनचालकांचे यामुळे आणखी हाल होत आहेत. शहरातील कोंडीसाठी वाहतूक पोलिसांसह इतर सरकारी यंत्रणा मेट्रोकडे बोट दाखवत आहेत.

मेट्रो सुरू झाल्यापासून आकडेवारी पाहिल्यास प्रवासी संख्येत वाढ होण्याऐवजी घट होत आहे. मेट्रो सुरू झाली त्या वेळी मागील वर्षी मार्चमध्ये दोन्ही मार्गांवरील प्रवासी संख्या ५ लाख १४ हजार होती. त्यानंतर एप्रिलमध्ये ती २ लाख २३ हजारांवर आली. प्रवासी संख्या मे महिन्यात १ लाख ८८ हजार, जून महिन्यात १ लाख २३ हजार आणि जुलैमध्ये ८० हजारांवर आली. ऑगस्ट महिन्यात मेट्रोची प्रवासी संख्या पुन्हा वाढून २ लाख २ हजारांवर पोहोचली. पुन्हा त्यात घसरण सुरू होऊन ती सप्टेंबर १ लाख २८ हजार, ऑक्टोबर १ लाख १३ हजार, नोव्हेंबर १ लाख १२ हजार आणि डिसेंबरमध्ये १ लाखावर आली. चालू वर्षातील जानेवारी महिन्यात प्रवासी संख्या १ लाख तर फेब्रुवारी महिन्यात ९० हजारांवर आली.

### मेट्रोचा वर्षभराचा प्रवास

दोन्ही मार्गांवरील प्रवासी : १९ लाख ७८ हजार १६०
दोन्ही मार्गांवरील उत्पन्न : २ कोटी ५८ लाख ७० हजार ५१०
मेट्रोची रोजची सरासरी प्रवासी संख्या – ५ हजार

> फुगेवाडी ते शिवाजीनगर न्यायालय, गरवारे महाविद्यालय ते शिवाजीनगर न्यायालय आणि शिवाजीनगर न्यायालय ते रूबी हॉल रुग्णालय या मार्गांचे काम महिनाअखेरीस पूर्ण होईल. यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त तपासणी करून अहवाल देतील. त्यांनी मान्यता दिल्यानंतर लगेचच या मार्गांवर सेवा सुरू होईल. सध्या मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या ५ हजार असून, हे मार्ग सुरू झाल्यानंतर ती दीड ते दोन लाखांवर जाईल.
>
> - हेमंत सोनावणे, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो

# बोटांचे ठसे जुळेनात, 'आधार' दुरुस्त होईना

## ज्येष्ठ नागरिकांना कामांमध्ये येतोय व्यत्यय

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'केंद्र सरकारने सर्वत्र आधार कार्ड सक्तीचे केले आहे. परंतु, आधार कार्डावरील चुकलेले नाव दुरुस्त करून ते अद्ययावत करण्याची प्रक्रिया ज्येष्ठांसाठी डोकेदुखी ठरत आहे.**

'आधार कार्डावरील आडनावाचे स्पेलिंग चुकले असून, ते दुरुस्त करण्यासाठी बोटांचे ठसे जुळत नाहीत, डोळ्यांचे स्कॅनिंगही होत नाही. गेल्या सात ते आठ वर्षांपासून या कामासाठी आधार दुरुस्ती केंद्रे, आधार नोंदणी शिबिरे, बँका-पोस्टांच्या कार्यालयात हेलपाटे मारत आहे. आधार कार्डावरील नावाची दुरुस्तीच होत नाही. मग आमच्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांनी काय करायचे,' असा उद्विग्न सवाल कोथरूड येथील ज्योती रिसबुड या ज्येष्ठ महिलेने केला आहे.

रिसबुड यांच्याप्रमाणेच शहरातील शेकडो ज्येष्ठ नागरिकांना आधार कार्डावरील तपशीलात दुरुस्ती करताना किंवा ते अद्ययावत करताना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. केंद्र सरकारने आधार कार्ड पॅन कार्डशी जोडण्यासाठी ३१ मार्च ही अखेरची मुदत दिली आहे. आधार-पॅन लिंक न झाल्यास एक एप्रिलपासून पॅन निष्क्रिय होणार आहे. त्याचा फटका आर्थिक कामांना बसू शकतो.

मात्र, अनेक ज्येष्ठांच्या आधार कार्डावरील तपशीलात चुका असून, त्यात दुरुस्ती करताना त्यांचा जीव मेटाकुटीला येत आहे.

### जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी




- ज्येष्ठ नागरिकांचे बोटांचे ठसे जुळत नसल्याने आधार दुरुस्तीत अडथळे येत असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे आल्या आहेत.
- जिल्हा प्रशासनाने याबाबत 'युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडिया'ला (यूआयडीएआय) कळविले आहे. मात्र, त्यावर अद्याप तोडगा निघालेला नाही.
- ज्येष्ठांच्या बोटांचे ठसे जुळत नसल्याने डोळ्यांचे स्कॅनिंग करण्याचा पर्याय आहे. परंतु, आधार ॲप्लिकेशनमध्ये त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

# वीजबिल फसवणुकीचे ९५ गुन्हे दाखल

## देवेंद्र फडवणीस यांची विधानसभेत माहिती

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'महावितरणच्या वीज ग्राहकांना बनावट मेसेजद्वारे ऑनलाइन वीजबिल भरण्यास सांगून गंडा घातल्याबद्दल राज्यात ९५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,' अशी माहिती ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेला लेखी उत्तरात दिली. 'महावितरणच्या वीज ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकांचा डेटा लीक झाला नाही,' असेही त्यांनी सांगितले.**

वीजबिल भरले नसल्यास वीजपुरवठा तोडण्याची भीती घालून सर्वसामान्यांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. या संदर्भात आमदारांनी विधानसभेत लेखी प्रश्न उपस्थित केला. महावितरणच्या वीजग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकाचा डेटा लीक झाल्यामुळेच ऑनलाइन वीजबिल भरण्याचे बनावट संदेश पाठविण्यात येत असून, याबाबत संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली, असा प्रश्न आमदारांनी विचारला. त्यावर फडणवीस यांनी महावितरणचा कोणताही डेटा लीक झाला नसल्याचे स्पष्ट केले. 'महावितरणच्या वीज ग्राहकांची बनावट संदेशाद्वारे ऑनलाइन बिल भरण्याबाबत फसवणूक होत असल्याप्रकरणी राज्यात ९५ गुन्हे दाखल करण्यातआले आहेत. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी वीजग्राहकांना अशा बनावट संदेशांना प्रतिसाद न देण्याचे आवाहन केले.

### अशी होते वीजग्राहकांची फसवणूक



सायबर चोरट्यांकडून खासगी क्रमांकांवरून वीजग्राहकांच्या मोबाइलवर संदेश पाठवला जातो, किंवा कॉल केला जातो. 'मी महावितरणमधून बोलत असून, तुम्ही मागील महिन्यांचे वीजबिल भरलेले नसल्याने रात्री साडेनऊ वाजता वीजपुरवठा बंद करण्यात येणार आहे,' अशी बतावणी करून सायबर चोरटे वीजग्राहकांना धमकावतात. कारवाई टाळण्यासाठी वीजग्राहकांना मोबाइलवर 'ॲप्लिकेशन' डाउनलोड करायला सांगतात. वीजग्राहकांनी संबंधित ॲप डाउनलोड केल्यावर त्यांच्याकडे चोरटे ओटीपी (वन टाइम पासवर्ड) मागतात. वीजग्राहकांकडून 'ओटीपी' घेतल्यावर चोरटे त्यांच्या बँक खात्यांमधून पैसे लांबवितात. पुण्यासह राज्यभरात अनेक वीजग्राहकांची अशा प्रकारे फसवणूक झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

# बेघरांसाठीची घरे आता आर्थिक दुर्बल घटकांना!

## » आ. महेश लांडगे यांचा पाठपुरावा: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणी

। पिंपरी। महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत 'बेघरांसाठी घरे' प्रायोजनार्थ आरक्षित घरांचा लाभ आर्थिक दुर्बल घटकांसाठी द्यावी. तसेच, या संदर्भातील महापालिका प्रस्तावाला मान्यता द्यावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**





याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे आकुर्डी (स.नं. १३६/१,आरक्षण क्र. २८३ येथे ०.९५ हेक्टर क्षेत्र) व मौजे पिंपरी (स.नं. / गट नं. १०९ पै व ११० पै आरक्षण क्र. ७७ येथे ०. ६४ हेक्टर क्षेत्र) येथील क्षेत्र 'बेघरांसाठी घरे' या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यात आले असून, भूसंपादनाद्वारे सदरची जागा महापालिका प्रशासनाने ताब्यात घेतली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने संबंधित आरक्षित जमिनीचा वापर घरे बांधण्यासाठी केला आहे. परंतु, आरक्षणाच्या वापरामध्ये बदल करण्यात आला आहे. बेघरांसाठी घरे (HDH) ऐवजी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) अशा प्रमाणे योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी महापालिका प्रशासक ठराव क्र. २२१ ला दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत परवडणारी घरे घटकांतर्गत मंजूर झालेल्या पिंपरी आणि आकुर्डी येथील आरक्षित जागेतील प्रकल्पांसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकडून ऑनलाईन अर्ज मागवून, ऑनलाईन छाननीद्वारे लाभार्थी निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे, असेही आमदार लांडगे यांनी राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले आहे.

> **"एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्रमांक ४.२७ अनुसार बेघरांसाठी घरे आरक्षणामध्ये बांधलेलया सदनिकांचे वाटप प्राधानमंत्री आवास योजनंतील (PMAY) पात्र लाभार्थींना करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव आहे. त्याला मंजुरी देण्यात यावी. ज्याद्वारे सर्वांसाठी घर संकल्पनेनुसार प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ अधिकाधिक लाभार्थींपर्यंत पोहोचवता येईल, अशी मागणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. त्याला सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.**
>
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



# राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## » प्रा. कविता आल्हाट: त्या महिला या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या नाहीत

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी उपाध्यक्षा खुशबु प्रशांत दिघे व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत दिघे, यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. त्यांच्या २५० समर्थकांनीही प्रवेश केला. शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी शिवबंधन बांधून सर्वांचे स्वागत केले.**



थेरगाव येथे झालेल्या पक्ष प्रवेशावेळी जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, युवासेना अधिकारी विश्वजित बारणे, शहरप्रमुख निलेश तरस, शहर संघटिका सरिता साने, पिंपरी विधानसभा संघटिका शैला निकम, देहूगाव शहर प्रमुख सुनील हगवणे, दिलीप कुसाळकर, सुनील पालकर, दत्ता भालेराव व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशांत दिघे, खुशबु प्रशांत दिघे यांच्यासह शुभम पाटील, संतोष चव्हाण, शारूख शेख, ऋषिकेश बोरूडे, अभिषेक काळे, अजय कांबळे, सुभोद गायकवाड, अक्षय गायकवाड, पुजा काळे, मंगला काळे व इतर महिला बचत गट, मीना धोत्रे, शोभा गाडवे, सविता गायकवाड, शिला म्हासाळ अशा सुमारे २५० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास असल्यानेच शिवसेनेत कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. माजी नगरसेवक देखील पक्षात येत आहेत. शहरात शिवसेनेचे संघटन मजबूत होत आहे. शिवसेना आगामी महापालिका निवडणुकीला पूर्ण ताकदीनिशी सामोरे जाणार आहे.

### निव्वळ खोडसाळपणा..

**» काही जबाबदार राजकीय मंडळींकडून त्यांच्या पक्षांमध्ये जोरदार "इनकमिंग सुरू असल्याचा भ्रम निर्माण करण्याचा खोडसाळपणा सुरू आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून, विविध प्रसार तंत्राच्या माध्यमातून त्यांच्या पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांची रीघ लागली आहे असे दाखविण्याचा जाणीवपूर्वक बनाव रचला जात आहे. मात्र कार्यकर्त्यांनी अशा अफवांवर आणि खोडसाळपणावर विश्वास ठेवू नये असे आवाहन प्रा.कविता आल्हाट यांनी केले आहे.**

### शिवसेनेचा दावा धादांत खोटा



**» पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेस कार्यकारणीमधील अडीचशे सदस्यांनी शिवसेनेत प्रवेश केला असे सांगितले जात असून हे धादांत खोटे आहे. या महिला पदाधिकाऱ्यांना आताच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला कार्यकारिणीने पदे दिलेली नाहीत. किंवा संघटनेची कोणतीही जबाबदारी दिली नसताना त्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या कशा होऊ शकतात? असा सवाल पिंपरी चिंचवड शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी केला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी निवेदन दिले असून या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरातील शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत खुशबु प्रशांत दिघे, प्रशांत दिघे यांच्यासह अडीचशे जणांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. त्याबाबतचे वृत्त काही सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आले.**

**मात्र ज्या महिला कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचा कोणत्याही अर्थी राष्ट्रवादी महिला काँग्रेस संघटनेशी संबंध नाही.**

**शिवसेनेकडून महिला पदाधिकाऱ्यांची जी नावे सांगितली जात आहेत. त्या महिला कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेसने कोणत्याही प्रकारची जबाबदारी दिलेली नाही. किंवा महिला शहराध्यक्ष या नात्याने मी त्यांना कोणतीही पदे दिली नसल्याचे आल्हाट यांनी म्हटले आहे.**

## संपादकीय

### जुनी पेन्शन मागणाऱ्यानो निराधार, विधवांचे काय ?

***मीठ आणि आपला जीवनव्यवहार यांचा अन्योन्य संबंध आहे. समाजव्यवहारात मिठावरून म्हणी, वाक्प्रचारही रुढ आहेत. 'खाल्ल्या मिठाला जागणे' असे आपण म्हणतो. मिठावरील कर कमी करावा या मागणीसाठी ब्रिटिश आमदनीत महात्मा गांधींनी प्रसिद्ध दांडीयात्रा काढली.***

गेल्या चार-पाच दिवसांपासून जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्यातील कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरणे सुरु केले आहे. ही योजना सरकारसाठी अवघड जागेवरचे दुखणे बनले आहे. थेट नाही म्हटले तर निवडणुकीत फटका बसतो आणि हो म्हटले तर मोठा आर्थिक आघात होतो अश्या वळणावर हा विषय आला आहे. ज्याला थोडेफार आर्थिक गणित समजते तो कोणताही अर्थमंत्री जुन्या पेन्शन योजनेला अजिबात सहमती देणार नाही मात्र राजकीय वातावरण आणि मतांचे गणित सगळ्यांच्या तोंडावर पट्टी लावते हे दिसून येत आहे. राज्यसरकार कर्मचाऱ्यांच्या पगारावर दरवर्षी १.१५ लाख खर्च करते आणि पेन्शनवर ३६ हजार कोटी खर्च करते ही एकूण रक्कम १.५१ लाख कोटी एवढी होते. राज्याच्या उत्पनाच्या ३८ टक्के हिस्सा केवळ दिड टक्के लोकांवर खर्च करणे अजिबात व्यवहार्य नाही ही बाब सगळ्यांना समजत असताना खरे बोलायला कुणी तयार नाही कारण सगळ्यांच्या मुखावर मतांची पाचर मारलेली आहे.

आपल्या राज्यात आमदारांचे पेन्शन ५० हजार केल्यावर बराच गदारोळ झाला अर्थात त्याचे समर्थन होऊ शकत नाही ,आमदारांची पेन्शन बंद व्हायला हवी. राज्यात ७८९ माजी आमदारांना दरवर्षी ६५ कोटी २७ लाख ६० हजार पेन्शन दिली जाते. दुसरीकडे विधवा,निराधार असणाऱ्या ५० लाख व्यक्तींना दरवर्षी ३ हजार कोटी वितरित केले जातात यापैकी प्रत्येकाच्या वाट्यावर केवळ १५०० रुपये येतात. त्याचवेळी ६ लाख निवृत्त कर्मचाऱ्यांना ६७ हजार ३८४ कोटी रुपये वितरित केले जात आहेत. एकूणच राज्याचा गाडा भरकटला आहे हे आता मान्य करायला हवे. जुन्या पेन्शनची मागणी करताना कुणाच्याही नजरेपुढे आपल्याच आजूबाजूला किंवा घरातल्या निराधार,विधवा व्यक्ती का येत नाहीत. महागाई भत्ता,विविध वेतन आयोग अश्या सतराशे छपन्न शिड्या तुम्ही चढत असताना या वर्गाच्या अनुदानात अजून वाढ का होत नाही हा प्रश्न कुणालाही का पडत नाही ? नुकतेच बजेटमध्ये सरकारने निराधार पेन्शन ५०० रुपयाने वाढवली. त्याचे स्वागत होते आहे.

# कमावत्या काळात बचत करा,पेन्शन हवी कशाला?




सरकारने २००५ साली बंद केलेली जुनी पेन्शन योजना सुरु करा यासाठी आता म्हणजे तब्बल १८ वर्षांनी सरकारी कर्मचारी संघटना आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाला ज्या काँग्रेस पक्षाचा पाठिंबा आहे त्याच पक्षाचे मुख्यमंत्री असताना २००५ सलत ही पेन्शन योजना बंद करण्यात आली. त्यानंतर सतत तीनवेळा दोन्ही काँग्रेसची सत्ता असताना एकाही काँग्रेसच्या नेत्याला जुन्या पेन्शन योजनेची आठवण आली नाही किंवा हा कर्मचारी वर्गावर अन्याय असल्याची भावना निर्माण झाली नाही. आज जे उद्धव ठाकरे सरकारच्या नावाने गळा काढतात तेही मागच्या काळात अडीच वर्ष मुख्यमंत्री पदावर बसलेले होते त्याही काळात हा अन्याय दूर करण्याचे त्यांना सुचले नाही. आता आगामी काळात येणारी दोन वर्ष निवडणुकांचा काळ आहे ,नगर पंचायत,पालिका,मनपा,जिल्हा परिषद,लोकसभा आणि विधानसभा अश्या लागोपाठ निवडणुका असून आजारी व्यक्तीला अंथरुणावर धडा शिकविला जाऊ शकतो या न्यायाने महाविकास आघाडीने हे नियोजन केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

जुनी पेन्शन योजना म्हणजे नेमके काय हे असंख्य लोकांना कळत नाही ,त्यांना वाटते की सरकार जे कर्मचारी निवृत्त झाले त्यांना पेन्शन देत नाही म्हणून त्यांचा लढा योग्य आहे.जुनी पेन्शन मध्ये निवृत्ती वेळच्या पगाराची निम्मे रक्कम पेन्शन मिळायची. नवी पेन्शन योजना सहभागाची आहे, ज्यात फक्त 8 टक्के रक्कम मिळते.तुमचा पगार 30 हजार असेल तर जुनी पेन्शन योजनेत १५ हजार पेन्शन बसायची. नवी पेन्शन योजनेत 30 हजार पगारावर 2200 रुपये पेन्शन बसते.जुनी पेन्शनमध्ये नोकदाराला स्वतःच्या पगारातून रक्कम द्यावी लागत नव्हती. नवी पेन्शनमध्ये दर महिन्याच्या पगारातून 10 टक्के रक्कम कर्मचारी आणि त्यावर 14 टक्के रक्कम सरकार देतं.नवी पेन्शन योजनेत जास्तीत जास्त पेन्शन ही 7 ते 9 हजारांपर्यंतच मिळते. मूळ मुद्दा लक्षात आला असेल की स्वतःच्या पगारातून एक रुपयाही कट न होता दरमहा चार आकडी रक्कम देणारी योजना याना हवी आहे.




राज्याच्या मुख्य सचिवांना सध्या सव्वादोन लाख रुपये पगार मिळतो ,ते निवृत्त झाले त्या दिवशी काही किरकोळ वाढ धरून त्यांना अडीच लाख पगार होता असे गृहीत धरले तर त्यांना मिळणारी पेन्शन जुन्या योजनेनुसार दरमहा सव्वालाख असेल. या पेन्शनला महागाई भत्तेही लागू असतील त्यामुळे हा निवृत्त सचिव जर आणखी दहा वर्ष जगला तरी कदाचित दरमहा दीड लाख पेन्शन घेईल त्याच काळात ग्रामीण भागात विनाअनुदानित शाळांवर १० हजार पगारात हजारो शिक्षक वर्षानुवर्षे काम करीत असतील. हे आमचे गणित चुकत असेल तर जिज्ञासूंनी त्यावर नक्कीच प्रकाश टाकावा. सरकारी नोकरीतून सुरक्षा येण्यासोबतच बेफिकिरी आणि मुजोरी जरा जास्त प्रमाणात आल्यामुळे सरकारी कर्मचारी कार्यालयीन वेळेत नेमके काय करतात याचा आता सामान्य माणसाला सुद्धा चांगलाच अभ्यास झाला आहे. या सर्वांचा परिपाक म्हणून राज्यभर या आंदोलनाला विरोध होतोय.

सरकारी नोकऱ्या मर्यादित आहेत आणि खासगी क्षेत्र मोठे असले तरी त्या क्षेत्रात कितीही पगार असला तरी कुणालाही पेन्शन दिले जात नाही ,नोकरीच्या काळात जो जेवढी बचत करेल तेवढा लाभ त्याला निवृत्तीनंतर मिळेल हे साधे सूत्र आता वापरले जाते. अलीकडे खासगी पेन्शन योजना भरपूर कंपन्यांनी सुरु केल्या आहेत त्याचा लाभ घेत अनेक लोक हजारो रुपये पेन्शन उत्तर वयात घेताना दिसतात. बचतीचे महत्व आपल्याला नवीन नाही अगदी संतांनी सुद्धा "जोडोनिया धन उत्तम व्यवहारे " यातून धन आणि त्याच्या बचतीचे महत्व विशद केले आहे. मात्र सरकारी कर्मचारी,अधिकारी म्हणजे सरकारचा जावई अशी जी काही म्हण रूढ झाली आहे ,तिला कर्मचाऱ्यांचा वर्तनाचा मजबूत आधार आहे.आजच्या काळात कोणत्याही सरकारी कार्यालयात सामान्य माणसाला येणारा अनुभव बघितला तर अपवाद वगळता सरकारी कर्मचारी काय दिवे लावतात हे सर्वत्र दिसून येत असते.

सरकारी कर्मचारी कर्तव्य आणि अधिकार यावर बरेच लिहिता येईल ,तो कदाचित स्वतंत्र पुस्तकाचा विषय होईल मात्र आजच्या घडीला जुनी पेन्शन या सर्वांना का हवी हे बऱ्यापैकी समजले असेल.

# विधवा, निराधारांचे शत्रू तरी नका होऊ!

**राज्य सरकारने गेल्या काही वर्षात सरकारी तिजोरीतून द्यावयाच्या रकमेत जी वाढ केली आहे तिचे कौतुक करताना राज्यातील ५० लाख निराधार, विधवा इत्यादींना दिल्या जाणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनचा विचार करायला कुणालाही फुरसद नाही कारण या वर्गाचा विधिमंडळात कुणी प्रतिनिधी नाही, सरकारवर दबाव आणावा एवढे त्यांच्यात बळ नाही.**

नवल म्हणजे गेल्या चाळीस वर्षात ३६ रुपयांवरून सुरु झालेली हे पेन्शन आजवर केवळ हजार पर्यंत आली आहे आणि याच काळात इतरांचे पगार पेन्शन आकाशाला गवसणी घालत आहे, ही निराधार,वृद्ध विधवा यांच्यावरील अन्यायाची परिसीमा आहे असेही कुणाला वाटत नाही. खुशाल जुनी पेन्शन योजना मागा,लागूही करून घ्या मात्र ज्यांच्या बळावर आपण जगत आहोत त्यांच्या विषयाचा औपचारिकता म्हणून तरी का होईना तुमच्या निवेदनात साधा उल्लेख तर करा. एवढेही होत नसेल तर तुमचा मतलबी हक्काचा लढा तुम्हालाच लखलाभ होवो.

आजच्या घडीला १५ कोटींच्या महाराष्ट्रात संजय गांधी निराधार,श्रावण बाळ ,इंदिरा गांधी वृद्धापकाळ,इंदिरा गांधी विधवा,इंदिरा गांधी दिव्यांग योजना या पाच योजनांचे लाभार्थी फक्त ५० लाख असणे हे वास्तवाला धरून नक्कीच नाही. या योजनेत नुकतेच वाढलेले ५०० रुपये धरून जेमतेम १५०० रुपये पेन्शन मिळते तरीही या योजनेचे



लाभार्थी वाढू नयेत यासाठी सरकारी यंत्रणा जीवाचा आटापिटा करताना दिसते. नियम,निकष आणि अति एवढ्या त्रासदायक घालून ठेवल्या आहेत की खरे लाभार्थी भीक मागून किंवा कुणाच्या तरी दयेवर कसातरी जगण्याचा संघर्ष करीत आहेत आणि बोगस लाभार्थी त्याचा लाभ घेत आहेत.

दिवसाला ५० रुपये देऊन आपण मोठे मानवतावादी काम केल्याचा आव सरकार आणीत असेल तर सरकार मधील कोणत्याही निवृत्त कर्मचाऱ्याने पेन्शन नाकारून १५०० रुपयांवर महिना काढून दाखविण्याचे धाडस करायला हवे.

या पेन्शनसाठी पात्रता उत्पन्नाची अट २१००० हजार रुपये आहे. ३६५ दिवसात २१००० म्हणजे एका दिवसात ५८ रुपये आणि कमावणारे निराधार जर दोन असतील तर एका व्यक्तीचे उत्पन्न २९ रुपये होते. एखाद्या योजनेसाठी इतके कमी उत्पन्न हे अत्यंत हास्यास्पद आहे.आज अगदी भिकारी सुद्धा यापेक्षा जास्त पैसे कमावतो..पण या योजनेत लाभार्थी वाढू नयेत म्हणून हा सारा खटाटोप आहे.बिहार आणि ओरिसा सारख्या ज्यांना आपण मागास राज्य समजतो.. त्यांनी समिती बसवून उत्पन्नाची अट २१००० वरून ६००००इतकी केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेत अनेक आमदारांनी मागच्या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला. तेव्हा येणाऱ्या अधिवेशनात ही उत्पन्नाची अट वाढवायला हवी व किमान १ लाखाची करायला हवी. हे पेन्शन वाढवण्याची मागणी केली की सरकार हमखास वित्तीय तुट,इतर खर्चाचे कारण देते पण नकार कोणाला द्यायचा हे सरकारांना चांगले माहित असते.

## ।। अभंगवाणी ।।



कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बेस्टचा 'वीज बिलवाढी'चा शॉक!

## वीजवहन आकारात प्रतियुनिट सरासरी 80 पैसे वाढ

। मुंबई । महाईन्यूज ।

**मुंबईतील जवळपास दहा लाख ग्राहकांना वीजपुरवठा करणाऱ्या 'बेस्ट' उपक्रमने नवीन दर प्रस्तावात वहन आकारात सरासरी ८० पैसे प्रतियुनिट वाढ प्रस्तावित केली आहे. या वाढीचा सर्वाधिक फटका उच्च वीज वापराच्या लघुदाब श्रेणीत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळेच या व्यावसायिकांच्या 'आहार' या संघटनेने वहन आकारचा निषेध केला आहे. वाढीव वहन आकाराचा 'आहार' या हॉटेल व्यावसायिकांच्या संघटनेने विरोध केला आहे. एकीकडे त्यांनी ही दरवाढ मागे घेण्याची मागणी केली असताना, हा वहन आकार बेकायदेशीर असल्याचा दावादेखील केला आहे.**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमईएआरसी) वीज वितरण कंपन्यांची दर पाच वर्षांनी दरनिश्चिती होत असते. या दरनिश्चितीचा मध्यकालीन आढावा घेतला जातो. त्यानुसार सध्याची दरनिश्चित १ एप्रिल २०२०ला लागू झाली. त्याचा मध्यकालीन आढावा अलीकडेच घेण्यात आला. या आढाव्यानुसार नवीन दर १ एप्रिलपासून लागू होणार आहेत. या नवीन दरांतच 'बेस्ट' उपक्रमने वहन आकारात वाढ प्रस्तावित केली आहे.

वीज देयक हे प्रामुख्याने लघुदाब (एलटी) व उच्चदाब (एचटी) या श्रेणीत असते. लघुदाब श्रेणी ही घरगुती अर्थात किरकोळ, व्यावसायिक या उपश्रेणीत विभागलेली असते. 'बेस्ट'च्या लघुदाब श्रेणीतील वहन आकार सध्या सरासरी १.३२ ते १.४९ रुपये प्रतियुनिट आहे. येत्या १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या नव्या वीज दर प्रणालीत हा दर 'बेस्ट'ने २०२३-२४ साठी २.२६ रुपये, तर २०२४-२५ साठी २.४८ रुपये प्रतियुनिट दर प्रस्तावित केला आहे. निव्वळ लघुदाब श्रेणीचा विचार केल्यास ही वाढ सरासरी १.१७ रुपये प्रतियुनिट होते. दुसरीकडे उच्चदाब श्रेणीसाठी सध्याचा दर सरासरी ४८ पैसे होता. तो दर नवीन प्रस्तावात २०२३-२४ साठी ८४ पैसे तर २०२४-२५ साठी ९२ पैसे प्रतियुनिट निश्चित केला आहे. दोन्ही श्रेणी मिळून विचार केल्यास, २०२३-२४ मधील सरासरी दरवाढ ८० पैसे प्रतियुनिट आहे. 'बेस्टने वहन आकार वाढवण्याचा प्रस्ताव एमईआरसीला सादर केला आहे. यामुळे सर्वसामान्यांना त्याचा फटका बसेलच. हॉटेल व्यवसायावरही त्याचा परिणाम होईल. छोट्या हॉटेल व्यावसायिकावरही महिन्याचा आर्थिक भार पडेल. याचा ग्राहक सेवेवरही निश्चित परिणाम होऊ शकतो. खाद्यपदार्थांसह अन्य दर वाढण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच या वाढीव वहन आकाराबाबत आम्ही 'एमईएआरसी'कडे आक्षेप नोंदविला आहे', असे 'आहार'चे अध्यक्ष सुकेश शेट्टी यांनी सांगितले.



> वहन आकार हा वीज तुमच्या मीटरपर्यंत आणण्यासाठीचा खर्च असतो. तो कायदेशीरच आहे. आधी हा आकार संयुक्तपणे आकारला जात होता. परंतु, १३० व्होल्ट क्षमतेने वीज खेचली जात असल्यास वीजगळती दोन ते तीन टक्के, तर २२० व्होल्टने वीज वापर होत असल्यास ही गळती २२ टक्क्यांपर्यंत असू शकते. त्यामुळेच हा वहन आकार वीज ग्राहकांच्या श्रेणीनिहाय निश्चित असावा, असे निर्देश वीज तदर्थ लवाद अर्थात ॲप्पीलेट ट्रायब्युनलने दिले आहेत.
>
> **- अशोक पेंडसे, ज्येष्ठ वीजविषयक अभ्यासक**

# आकर्षक डिझायनसह नवीकोरी हिरकणी लवकरच सेवेत!

## एसटी बस प्रवाशांसाठी आनंदाची बातमी: नव्या बस गाड्यांची बांधणी सुरू

। मुंबई । महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळातील दापोडीस्थित मध्यवर्ती कार्यशाळेत नव्या बस गाड्यांची बांधणी सुरू आहे. सर्वसामान्यांच्या पसंतीस उतरलेली निमआराम श्रेणीतील हिरकणी (एशियाड) राज्यातील रस्त्यावरून नामशेष होत आहेत. एकेकाळी एसटीची ब्रँडसेवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिरकणीला संजीवनी देण्यासाठी २०० हिरकणीची बांधणी या कार्यशाळेत करण्यात येत आहेत.**





### हिरकणी बसची वैशिष्ट्ये:

» बस आकर्षक दिसावी म्हणून आतील बाजूस थर्मोप्लास्टिक शीट लावण्यात आली आहे.

» प्रवासी दरवाजाच्या सहज कार्यप्रणालीसाठी स्वयंचलित जॅक आणि नाईफ प्रकारचा दरवाजा बसवण्यात आला आहे. त्यामुळे दरवाजा आतील बाजूस सरकत्या पद्धतीने उघडला जातो.

» प्रवाशांच्या संरक्षणासाठी आणि स्क्रू दिसू नयेत यासाठी स्क्रू हेडवर कॅप कव्हर लावण्यात आले आहेत. त्यामुळे गाडी सुशोभित दिसते.

» बस आकर्षक दिसावी यासाठी तयार 'डिसेन्सी फ्रेम' बसवण्यात आली आहे.

» रीडींग लॅम्प आणि चार्जिंग सॉकेटची सुविधा असलेली तयार हॅटरॅक (डोक्यावर सामान ठेवण्याची जागा) पुरवण्यात आली आहेत.

» प्रवाशांसाठी मॅगझीन पाऊच, पाण्याची बाटली ठेवण्यासाठी होल्डर तसेच बॅग हुक इत्यादी सुविधांसह आरामदायक आसने बसवण्यात आल्या आहेत.

» बसचे सौंदर्य वाढवण्यासाठी पुढील बाजूस चालकासमोर तयार (READY TO FIT) डॅशबोर्ड बसवण्यात आले आहेत.

» बसची देखभाल दुरुस्ती सुलभ व्हावी यासाठी बसच्या फ्लोअरवरील विविध ठिकाणी हॅन्डल सुविधा पुरवण्यात आली आहे.

» बसची रंगसंगती पॅपिरस पांढरा, पानांचा हिरवा आणि शुद्ध भगवा रंग अशा आकर्षक रंगात केली आहे. यापुढे जांभळ्या व पांढऱ्या रंगसंगतीत पूर्वीप्रमाणे हिरकणीसाठी रंगसंगती नियोजित आहे.

» बॅटरी बॉक्स, प्रवाशी सामान कक्ष, राखीव टायर (स्पेअर व्हील बॅकेट), एफ.आर.पी बोनेट, इत्यादींच्या सुलभ हाताळणीसाठी आणि धुळीपासून संरक्षण होण्यासाठी लॉक कव्हर बसविण्यात आले आहेत.

# उद्धव ठाकरे अफझल खानासारखे आले!

## रामदास कदम यांची टीका



। मुंबई। महाईन्यूज ।

काही दिवसांपूर्वीच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची खेडमध्ये जाहीर सभा झाली. या सभेत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या बंडखोर आमदारांवर सडकून टीका केली होती. उद्धव ठाकरेंना उत्तर देण्यासाठी आता शिंदे गटाकडून खेडमधील त्याच मैदानात एकनाथ शिंदे यांची सभा आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, या सभेपूर्वी शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. रामदास कदम म्हणाले की, "उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अडीच वर्षात कधीच बाहेर पडले नाहीत. तेव्हा बळीराजा कुठे गेला होता. तेव्हा त्यांचं शहाणपण कुठे गेलेलं? आता उद्धव इथे सभा घ्यायला अफझल खानासारखे अख्ख्या महाराष्ट्रातून सर्व लोकांना घेऊन आले.

### शिंदे मुख्यमंत्री झाल्यामुळे यांच्या पोटात पोटशूळ : कदम

कदम म्हणाले की, "एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे बळीराजासाठी निर्णय घेत आहेत. त्यांचं मंत्रिमंडळ राज्याच्या हिताचे निर्णय घेत आहे. पण आता यांच्या पोटात पोटशूळ उठला आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले म्हणून यांच्या पोटात पोटशूळ उठला आहे. उद्धव ठाकरे यांनी योगश कदम यांना राजकारणातून संपवण्याचा विडा उचलला होता. यापूर्वी मला संपवण्यासाठी संजय कदम यांना तीन वेळा मातोश्रीवर बोलावण्यात आलं होते.

# नेपाळमध्ये सोलो ट्रेकिंग करण्यास बंदी!

## 1 एप्रिलपासून लागू होणार नियम, नेपाळचा सर्वात मोठा उत्पन्नाचा स्त्रोत पर्यटन

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**मांउट एव्हरेस्टनंतर पाच वर्षांनी आता नेपाळ सरकारने देशभरात सोलो ट्रेकिंगवर बंदी घातली आहे. नेपाळमधील पर्वतांवर पर्यटक आणि पर्वतप्रेमींचा मोठा ओघ दिसतो जे आश्चर्यकारकपणे हिमालयातील शिखरे सर करतात. नेपाळ टुरिस्ट बोर्डाने (NTB) घेतलेला हा निर्णय 1 एप्रिलपासून लागू होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.**



### ट्रेकिंगसाठी ओळखले जाते नेपाळ

नेपाळमध्ये जगातील आठ उंच पर्वत आहेत आणि ते ग्रामीण भागातील सुंदर ट्रेकिंग क्षेत्रांसाठी देखील ओळखले जाते. आता, ज्यांना दुर्गम भागात ट्रेक करायचा आहे त्यांनी सरकारी परवाना असलेल्या मार्गदर्शकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे किंवा गटात सामील होणे आवश्यक आहे.

### ट्रेकिंग हा नेपाळचा सर्वात मोठा उत्पन्नाचा आहे स्त्रोत

नेपाळचा सर्वात मोठा उत्पन्नाचा स्त्रोत पर्यटन आहे, विशेषतः ट्रेकिंगमधून. पण शोध-आणि-बचाव मोहिमेचा खर्च देशाला प्रत्येक वेळी करावा लागतो.एकट्या फिरताना हरवलेल्या गिर्यारोहकाला शोधण्यासाठी जास्त पैसा खर्च करावा लागतो.

### सोलो ट्रेकिंगवर बंदी

नेपाळ टुरिझम बोर्डाचे प्रभारी मणिआर लामिछाने यांनी एका मुलाखतीत सांगितले की, जर तुम्ही एकटे ट्रेकिंग करत असाल तर तुम्हाला मदत करायला कोणी नसेल. लामिछाने यांनी पुढे सांगितले की, “जेव्हा पर्यटक बेपत्ता होतात किंवा मृत आढळतात, तेव्हा ते दूरस्थ मार्गाने जातात म्हणून सरकारही त्यांना शोधू शकत नाही”.

### पर्यटकांसाठी TIMS कार्ड अनिवार्य

**»नेपाळ टुरिस्ट बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, 2019 मध्ये सुमारे 50,000 पर्यटकांनी नेपाळमध्ये मार्गदर्शक किंवा कुलीशिवाय प्रवास केला. या पर्यटकांनी मार्ग परमिट तसेच ट्रेकर्स इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टम (TIMS) कार्ड मिळवून ट्रेकिंग केले.**



### TIMS परवानग्या थांबवल्या

**» साहसी पर्यटन करणाऱ्या परदेशी पर्यटकांसाठी TIMS कार्ड हे अधिकृत ट्रेकिंग परमिट आहे. परंतु नियमांच्या नवीनतम फेरीने मार्गदर्शकाशिवाय TIMS परवानग्या थांबवल्या आहेत. लामिछाने म्हणाले की, “पर्यटकांना ट्रेकिंग कंपनीच्या माध्यमातून ट्रेक करावे लागते.**

### विरोधकांचे धरणे

**»बोर्डाने TIMS परमिटची किंमतही प्रति व्यक्ती २००० रुपये केली आहे. यापूर्वी, मोठ्या गटात प्रवास करणाऱ्यांना TIMS कार्डसाठी १००० रुपये मोजावे लागत होते, तर एकट्याने प्रवास करणाऱ्यांना २००० रुपये मोजावे लागत होते. सार्क नागरिकांसाठी TIMS परवाना देखील 1,000 रुपये करण्यात आला आहे.**

---

# सिसोदियांच्या ईडी कोठडीत न्यायालयाने दिली 5 दिवसांची वाढ!

## अबकारी धोरणासंबंधित गैरव्यवहारप्रकरण

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कोठडीत असलेले आम आदमी पक्षाचे नेते व दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत दिल्लीच्या न्यायालयाने शुक्रवारी पाच दिवसांची वाढ केली. ‘ईडी’ने सिसोदियांच्या कोठडीत सात दिवसांची वाढ देण्याची मागणी केली होती. न्यायालयाने २२ मार्चपर्यंत ही मुदतवाढ दिली आहे**

दिल्ली अबकारी धोरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अटकेत असलेल्या सिसोदियांना ‘ईडी’चे विशेष न्यायाधीश एम. के. नागपाल यांच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी दिल्लीतील या ‘राऊज अ‍ॅव्हेन्यू’ न्यायालयात कडक सुरक्षाव्यवस्था होती. ‘ईडी’कडून न्यायालयात सांगण्यात आले, की सिसोदियांच्या अटकेदरम्यान या प्रकरणी महत्त्वाची माहिती मिळाली आहे. सिसोदिया व अन्य आरोपींची एकत्रित चौकशी करायची आहे. या अन्य आरोपींमध्ये माजी अबकारी आयुक्त राहुल सिंह, दिशेश अरोरा आणि अमित अरोरा यांचा समावेश आहे.

‘ईडी’ने सांगितले, की सिसोदियांचे माजी सचिव सी. अरविंद यांच्या सोबतही सिसोदियांची चौकशी करायची आहे. सी. अरविंद या प्रकरणी आरोपी नाहीत. ‘ईडी’ने न्यायालयास सांगितले, की सिसोदियांच्या ‘ई मेल’मधून मिळालेली माहिती व त्यांच्या मोबाईल संचाचे न्यायवैद्यक विश्लेषणही करण्यात येत आहे. ‘ईडी’ने या प्रकरणी सिसोदियांना ९ मार्च रोजी तिहार कारागृहातून अटक केली होती. त्याआधी या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सीबीआयने सिसोदियांना २६ फेब्रुवारी रोजी अटक केली होती.

### मुदतवाढीस विरोध

**» सिसोदियांच्या वकिलांनी कोठडीत वाढ करण्यास विरोध करत सांगितले, की तथाकथित गुन्ह्यांतून मिळालेल्या उत्पन्नाबाबत ‘ईडी’ मौन बाळगून आहे. मात्र, या प्रकरणी हीच बाब केंद्रस्थानी आहे. कोठडीची मुदत वाढवण्यात काहीच अर्थ नाही. सिसोदिया यांच्या आधीच्या सात दिवसांच्या कोठडीत फक्त चार लोकांसोबत चौकशी झाली.**

# मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला विश्वास

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षाच्या (BJP) नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA)२०२४ मध्येही सरकार स्थापन करेल आणि नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी सांगितले. इंडिया टुडेने आयोजित केलेल्या ‘इंडिया टुडे कॉन्क्लेव्ह’मध्ये ते बोलत होते.**

मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर जम्मू-काश्मीर, ईशान्य भाग आणि माओवाद्यांच्या समस्या या तीन महत्त्वाच्या बाबींचा मोठ्या प्रमाणात निपटारा करण्यात आला. पाकिस्तानमध्ये भारताने सर्जिकल स्ट्राईक केल्यानंतरही कोणत्याही परकीय शक्तीने देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची हिंमत केली नाही, असे गृहमंत्री अमित शाह यांनी अधोरेखित केले. ते म्हणाले, “देशाचे पुढचे पंतप्रधान कोण असेल हे जनता ठरवेल. मी देशातील सर्व भागांचा आणि राज्यांचा दौरा केला आहे. त्यावरून मी सांगू शकतो की, पुढील सरकार भाजप बनवेल आणि मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील. २०२४ च्या निवडणुकीत एनडीएला किती जागा मिळतील, याबद्दल शहा म्हणाले की, २०१९ मध्ये मिळालेल्या जागांपेक्षा नक्कीच त्या जास्त असतील.

### 1970 नंतर पहिल्यांदाच असे घडणार



**» अमित शाह म्हणाले की, १९७०नंतर पहिल्यांदाच नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार आहेत. २०१४ मध्ये मोदी सरकार पहिल्यांदा सत्तेवर आले, तेव्हा ६० कोटी लोकांकडे बँक खाती नव्हती, १० कोटी लोकांना शौचालये नव्हती आणि तीन कोटी लोकांकडे वीज कनेक्शन नव्हते. मोदी सरकारने या सर्वांना ते मिळवून दिले. बँका, शौचालये, मोफत अन्न, वीज आणि गॅस कनेक्शन, एवढेच नाही तर भारताबाहेरही जगात कुठली समस्या उद्भवल्यास इतर जागतिक नेते मोदींकडे आशेने पाहतात, असेही शहा म्हणाले. करोना साथीचा प्रसार मोदी सरकारने अत्यंत कार्यक्षमतेने हाताळला आणि देशातील सर्व नागरिकांना यशस्वीरीत्या लसवंत केले. जम्मू आणि काश्मीरमधील हिंसाचारात ७० टक्के घट झाली, नक्षलग्रस्त भागात ६० टक्के कमी हिंसाचार झाला आणि अनेक बंडखोरांनी आत्मसमर्पण केले.**

# नागराज मंजुळे का घेतो आकाश ठोसरला सिनेमात?



मराठीतील आगामी सिनेमा 'घर बंदूक बिरयानी'ची कास्ट महाराष्ट्र टाइम्स ऑनलाइनच्या 'मटा कॅफे'मध्ये पोहोचली होती. या मुलाखतीमध्ये सयाजी शिंदे आणि नागराज मंजुळे यांच्यासोबत कॅंडिड गप्पा झाल्या. सयाजी आणि नागराज यांनी या मुलाखतीत 'कंपूशाही' या विषयावरही भाष्य केले. काही दिवसांपूर्वी मराठीतील आघाडीची अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिने कंपूशाही विषयी भाष्य केले होते. त्यावेळी नागराज मंजुळे त्यांच्या सिनेमात आकाश ठोसरला कास्ट करतात, असे तिने म्हटले होते. यावरुन मराठी सिनेविश्वातील गटबाजी किंवा कंपूशाही यावर विशेष चर्चा झाली होती. याबाबतच नागराज आणि सयाजी यांना 'मटा कॅफे'मध्ये प्रश्न विचारण्यात आला.

मराठी सिनेविश्वात कंपूशाही आहे का किंवा कंफर्ट झोनसाठी ठराविक कलाकारांसोबतच काम करण्याचा प्रकार होतो का, असा सवाल नागराज मंजुळे आणि सयाजी शिंदे यांना या मुलाखतीमध्ये विचारण्यात आला. त्यावेळी सयाजी यांनी असे उत्तर दिले की, 'कलेमध्ये कंपूशाही असू शकत नाही. एखादा व्यक्ती जवळचा आहे म्हणून त्याच्यावर मी २ कोटींची गुंतवणूक केली आणि नुकसान झाले तरी चालेल, असं आपण करत नाही. कला सादर करताना त्याची गरज काय आहे हा मूळ दृष्टिकोन असतो.'

तर नागराज असे म्हणाले की, 'कंफर्ट झोन सगळीकडे असतो. तेजस्विनी पंडितच्या मताशी मी सहमत आहे. तेजस्विनी आणि संजय जाधव मुद्दाम एकत्र काम करतात, असं नसतं. त्यांनी एकत्र काम करण्यास सुरुवात केली होती, त्यांच्याच चांगली मैत्री आहे. आता माझ्या गावचे मित्र माझे अजूनही चांगले मित्र आहेत, मी एखाद्याशी अमेरिकेत जाऊन बळजबरीने मैत्री करू शकत नाही. असंही नाही की याच लोकांशिवाय काही करायचं नाही.

# आईच्या वाढदिवशी हळवा झाला जितेंद्र जोशी

## सर्व माऊलींसाठी लिहिली भावुक करणारी पोस्ट

मुंबई: जितेंद्र शकुंतला जोशी हे नाव मनोरंजन विश्वात लोकप्रिय आहे. जितेंद्र हा उत्तम अभिनेता तर आहेच शिवाय तो संवेदनशील लेखक, कवी देखील आहे. सोशल मीडियावर अनेकदा तो कविता शेअर करत असतो. जितेंद्रच्या कवितांना नेटकरी आणि त्याचे चाहते भरभरून दादही देत असतात. जितेंद्रचं त्याच्या आईशी खूप घनिष्ठ नातं आहे. जितेंद्र त्याच्या नावात आईचं नाव लावतो, यावरून त्याचं आईशी असलेलं बॉंडिंग दिसून येतं. जितेंद्रच्या आईचा म्हणजे शकुंतला जोशी यांचा आज वाढदिवस. आईच्या वाढदिवसानिमित्त जितेंद्रनं त्याच्या भावना कवितेमधून व्यक्त केल्या आहेत. ही कविता जितेंद्रनं त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. ही कविता पोस्ट करताना त्यानं आईला शुभेच्छा तर दिल्या आहेच. शिवाय ही कविता जितेंद्रनं सर्व मातांना समर्पित केली आहे.



जितेंद्रनं सोशल मीडियावर ही कविता शेअर करत असताना आईचे काही फोटो शेअर केले आहेत. त्यात तरुणपणीची आई, आईबरोबरचा त्याचा फोटो, तसंच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा फोटो आणि जितेंद्रची लेक आणि त्याची आई यांचे काही फोटो त्यानं शेअर केले आहेत. या फोटोंमधून आईशी त्या सर्वांचं असलेलं अनोखं बॉंडिंग दिसत आहे.

जितेंद्रनं त्याच्या आईबद्दलच्या भावना व्यक्त करताना जी कविता लिहिली आहे ती अतिशय भावुक करणारी आहे. जितेंद्रनं ही कविता हिंदीमधून लिहिली आहे. कवितेचं शेवटचं कडव अतिशय भावुक करणारं असं आहे. जितेंद्रनं लिहिलं आहे की,'मां आखरी चाह मेरी है, इसको भी तुम पूरी करना, जब तक मेरी आंख है ज़िंदा खुद को उससे दूर ना करना...' पोस्टच्या शेवटी जितेंद्रनं आईला टॅग करत तिचा मुलगा असल्याचा अभिमान वाटत असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# सायली पाटील-आकाश ठोसरचा सर्वात रोमॅंटिक अंदाज

अभिनेता आकाश ठोसर आणि अभिनेत्री सायली पाटील ही रिफ्रेशिंग जोडी लवकरच 'घर बंदूक बिरयानी' या सिनेमात दिसणार आहे. दिग्दर्शक हेमंत जंगल अवताडे आणि क्रिएटिव्ह दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा हा सिनेमा येत्या ७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. आकाश ठोसर, नागराज मंजुळे आणि सयाजी शिंदे यांच्या मुख्य भूमिका सिनेमात पाहायला मिळतील. शिवाय 'घर बंदूक बिरयानी'चा नेमका अर्थ काय याचा उलगडाही ७ एप्रिल रोजी थिएटरमध्ये होईल. या सिनेमाच्या ट्रेलरवरुन सयाजी आणि नागराज यांच्यामध्ये खतरनाक ॲक्शन पाहायला मिळणार आहे. मात्र दुसरीकडे आकाश ठोसरवर या सिनेमातही प्रेमाचा रंग चढलेला दिसेल. आकाश आणि सायलीची जोडी या सिनेमात दिसणार आहे.

या नव्या जोडीला सिनेमात पाहण्यासाठी प्रेक्षक असून सध्या हे दोघेही 'घर बंदूक बिरयानी'चे प्रमोशन करण्यात व्यग्र आहेत. या सिनेमाची टीम अवघा महाराष्ट्रभर प्रमोशननिमित्ताने फिरते आहे. या प्रमोशनदरम्यान सायली-आकाशचा एक रोमॅंटिक व्हिडिओ समोर आहे. रील व्हिडिओमध्ये अवघ्या १५-२० सेकंदांमध्ये त्यांच्यातील भन्नाट केमिस्ट्री दिसून आली. या दोघांनी त्यांच्याच सिनेमातील 'गुन गुन' गाण्यावर डान्स केला आहे. त्यांच्यातील हा रोमॅंटिक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतो आहे.



# रजनीकांत यांनी केली जीवाची मुंबई



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन वनडे मालिकेतील पहिला सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा ५ गडी राखून पराभव करत मालिकेची धमाकेदार सुरुवात केली. वानखेडेवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध २००७ नंतरचा हा दुसरा विजय आहे. हा सामना पाहण्यासाठी सुपरस्टार रजनीकांत स्टेडियमवर गेले होते. आता थलायवाला सामना पाहायला येणार आणि तो सामना भारत जिंकणार नाही असं तर होणार नाही ना! वृत्तानुसार, रजनीकांत यांना बीसीसीआयने भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामना पाहण्यासाठी आमंत्रित केले होते.

# दुसऱ्या वनडे सामन्यावर पावसाचे संकट!

## भारत-ऑस्ट्रेलियाचा दुसरा वनडे सामना उशिरा सुरू होणार

। विशाखापट्टणम । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यावर पावसाचे संकट आहे. कारण पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे या सामन्याचे भवितव्य हे पावसावर अवलंबून असेल असे म्हटले जात आहे. दुसऱ्या सामन्यात पाऊस कधी पडू शकतो, या गोष्टीचा हवामानाचा अंदाज आता समोर आला आहे. .**



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यावर पावसाचे संकट असल्याचे आता समोर आले आहे. कारण या सामन्याच्या आनंदात पाऊस मिठाचा खडा टाकू शकतो, असे म्हटले जात आहे. पण रविवारी नेमका पाऊस कधी पडणार, याबाबत हवामान खात्याचे आता माहिती दिली आहे.

सध्याच्या घडीला देशभरात सर्वच ठिकाणी पाऊस पडत आहे. वरुण राजाने कृपा केली आणि त्यामुळे पहिला वनडे सामना हा मुंबईत होऊ शकला. कारण मुंबईतही पावसाचे वातावरण होते, पण या लढतीमध्ये पावसाचा व्यत्यय आला नाही. पण विशाखापट्टणममधील चित्र मात्र वेगळे आहे. कारण येथे पावसाचा अलर्ट देण्यात आलेला आहे.

आंध्र प्रदेशचे हवामानतज्ञ बी. साई प्रणीत यांनी सांगितले की, " पाऊस हा भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या वनडे सामन्यात अडथळा आणू शकतो. त्यामुळे सामन्याची काही षटकं कमी होऊ शकतात, पण पावसामुळे हा सामान रद्द केला जाईल, अशी शक्यता सध्याच्या घडीला तरी वाटत नाही. सामना सुरु होण्यापूर्वी पाऊस पडण्याची सर्वात दाट शक्यता आहे. त्यामुळे हा सामना उशिरा सुरु होऊ शकतो. त्यामुळे सामन्याच्या सुरुवातीलाच पाऊस खोडा घालू शकतो. त्यानंतर सामना सुरु झाल्यावरही काही काळ पाऊस पडू शकतो. पण हा पाऊस मोठा नसेल, त्यामुळे सामना रद्द होईल अशी शक्यता कमी आहे. रविवारी ३१ ते ५१ टक्के पाऊस पडू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे."

दुसरा सामना सुरु होण्यापूर्वी पावसाचे आगमन होऊ शकते. त्यामुळे जोपर्यंत मैदान पूर्णपण सुकवले जात नाही तोपर्यंत सामना सुरु होऊ शकत नाही. त्यामुळे हा सामान उशिरा सुरु होण्याची दाट शक्यता आहे. त्याचबरोबर सामना सुरु असताना पाऊस पडला तर खेळ थांबवण्यात येईल आणि काही षटकं वाया जाऊ शकतात. त्यामुळे हा सामना ५० षटकांचा खेळवला जाईल, असे सध्याच्या घडीला तरी वाटत नाही. कारण पावसावर या सामन्याचे भवितव्य अवलंबून असेल, असे आता म्हटले जात आहे.

### रोहित शर्मासाठी दुसरा वनडे सामना ठरणार लकी

रोहित शर्मा हा दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय संघात पुनरागमन करणार आहे. पण कमबॅक करत असतानाच रोहित शर्मासाठी हा सामना लकी ठरणार असल्याचे दिसत आहे. कारण हा सामान रोहितसाठी का लकी ठरू शकतो, याचे कारण आता समोर आले आहे.

रोहित शर्मा हा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या वनडेत खेळू शकला नव्हता. रोहितने आपल्या मेव्हण्याच्या लग्नासाठी बीसीसीआयकडे सुट्टी मागितली होती आणि तिला मंजूरी मिळाली होती. त्यामुळे पहिल्या वनडेमध्ये भारताच्या कर्णधारपदी हार्दिक पंड्याची नियुक्ती करण्यात आली होती. हार्दिकच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला वनडे सामना पाच विकेट्स राखून जिंकला. पण आता रोहित भारतीय संघात कमबॅक करणार आहे आणि पुढील दोन्ही सामन्यांसाठी तो भारताचा कर्णधार असणार आहे. पण रोहित योग्यवेळी कमबॅक करत असल्याचे आता समोर आले आहे. कारण हा सामना आता भारतासाठी लकी ठरू शकतो, असे समोर आले आहे.

### दुसरा वनडे सामना उशिरा सुरु होणार




**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा सामना रविवारी विशाखापट्टणम येथे होणार आहे. पण हा सामना उशिरा सुरु होणार असल्याची माहिती आता नुकतीच समोर आली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा सामना विशाखापट्टणमला होणार आहे आणि या सामन्याची निर्धारित वेळ जही दुपारी १.३० अशी देण्यात आली आहे. पण तरीही हा सामना आता उशिरा सुरु होणार असल्याची माहिती समोर आली आहे. विशाखापट्टणममध्ये पावचा अलर्ट देण्यात आला आहे. सामन्याच्या दिवशी म्हणजे रविवारी ५१ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आले, असे म्हटले जात आहे. त्याचबरोबर सामना सुरु होण्यापूर्वी पाऊस पडणार असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. त्यामुळे सामना सुरु होण्यापूर्वी जर पाऊस पडला तर मैदान ओले असेल. जोपर्यंत मैदान सुकवले जात नाही तोपर्यंत हा सामना सुरु होणार नाही.**

# विल्यमसन-निकोल्स जोडीने न्यूझीलंडसाठी रचला इतिहास

## एकाच डावात 2 फलंदाजांनी द्विशतक झळकावणारी जगातील 18वी जोडी

। नाशिक । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**केन विल्यमसननंतर हेन्री निकोल्सने वेलिंग्टनमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत द्विशतक ठोकून इतिहास रचला आहे. कसोटी क्रिकेटच्या एका डावात द्विशतक झळकावणारी विल्यमसन आणि निकोल्स ही जगातील १८वी जोडी ठरली आहे. केन विल्यमसन २१५ धावांवर बाद झाला, तर हेन्री निकोल्सने नाबाद २०० धावा केल्या. या दोन खेळाडूंच्या अप्रतिम खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने पहिला डाव ४ गडी गमावून ५८० धावांवर घोषित केला. यापूर्वी जागतिक क्रिकेटमध्ये, एकाच डावात दोन फलंदाजांनी द्विशतक झळकावणे एकूण १७ वेळा घडले होते. या यादीत सामील होणारी न्यूझीलंडची केन विल्यमसन आणि हेन्री निकोल्स ही पहिली जोडी आहे.**



याआधी जागतिक क्रिकेटमध्ये, एकाच डावात दोन फलंदाजांनी द्विशतक झळकावने एकूण १७ वेळा घडले आहे. या यादीत समाविष्ट होणारी न्यूझीलंडची ही पहिली जोडी आहे. ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी हा पराक्रम सर्वाधिक ५ वेळा केला आहे. त्याचबरोबर श्रीलंकेने चारवेळा आणि पाकिस्तानने चारवेळा अशी कामगिरी केली आहे. पॉन्सफोर्ड (२६६) आणि ब्रॅडमन (२४४) ही कसोटी क्रिकेटच्या एका डावात दोन द्विशतके झळकावणारी जगातील पहिली जोडी होती, ज्यांनी १९३४ मध्ये इंग्लंडविरुद्ध अशी कामगिरी केली होती. त्याचबरोबर या यादीत भारताची एकमेव जोडी आहे. गौतम गंभीर आणि व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी २००८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध द्विशतके झळकावली होती.

### एका डावात 2 द्विशतके झळकावणाऱ्या जोड्या

- पॉन्सफोर्ड (२६६) आणि ब्रॅडमन (२४४) – विरुद्ध इंग्लंड, १९३४
- ब्रॅडमन (२३४) आणि बार्न्स (२३४) – विरुद्ध इंग्लंड, १९४६
- सोबर्स (३६५) आणि हंट (२६०) – विरुद्ध पाकिस्तान, १९५८
- लॉरी (२१०) आणि सिम्पसन (२०१) – विरुद्ध , १९६५
- जावेद मियाँदाद (२८०) आणि मुदस्सर नजर (२३१) – विरुद्ध भारत, १९८३
- गॅटिंग (२०७) आणि फॉलर (२०१) – विरुद्ध भारत, १९८५
- कासिम उमर (२०६) आणि जावेद मियांदाद (२०३) – विरुद्ध श्रीलंका, १९८५
- जयसूर्या (३४०) आणि महानामा (२२५) – विरुद्ध भारत, १९९७
- एजाज अहमद (२११) आणि इंझमाम-उल-हक (२००) – विरुद्ध श्रीलंका, १९९
- संगकारा (२७०) आणि अटापट्टू (२४९) – विरुद्ध झिम्बाब्वे, 2004
- हिंड्स (२१३) आणि चंद्रपॉल (२०३) – विरुद्ध दक्षिण आफ्रिका, २००५
- जयवर्धने (३७४) आणि संगकारा (२८७) – विरुद्ध दक्षिण आफ्रिका, २००६
- स्मिथ (२३२) आणि मॅकेन्झी (२२६) – विरुद्ध बांगलादेश, २००८